

आ.सुनील शेळके यांची यवतमाळ जिल्ह्यात प्रकल्प पाहणी

e Paper

दैनिक **मेट्रो सिटी वृत्तांत**

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in | बुधवार दिनांक 13/08/२०२५ | METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 180 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com


# केंद्र सरकारचा मोठा निर्णय!

## ४ नवीन सेमीकंडक्टर प्रकल्पांना मंजुरी, तब्बल ४,६०० कोटींची गुंतवणूक

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंगळवारी एक मोठा निर्णय घेण्यात आला आहे. देशात आणखी चार नवीन सेमीकंडक्टर प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे.**

**याआधी देशातील विविध शहरात ६ सेमीकंडक्टर प्रकल्प आधीच मंजूर आहेत.**

**त्यानंतर आज पुन्हा आणखी चार नवीन सेमीकंडक्टर प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे.**



मंजुरी देण्यात आलेले हे नवीन सेमीकंडक्टर प्रकल्प ओडिशा, आंध्र प्रदेश आणि पंजाबमध्ये असणार आहेत. या प्रकल्पामध्ये तब्बल ४,६०० कोटी रुपयांच्या गुंतवणूक होणार आहे. या सेमीकंडक्टर प्रकल्पाच्या माध्यमातून हजारो तरुणांना रोजगाराच्या संधी निर्माण होतील. तसेच या निर्णयांमुळे देशातील सेमीकंडक्टर इकोसिस्टम आणखी मजबूत होईल.

केंद्र सरकारच्या या निर्णयासंदर्भात केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी माहिती सांगितली. आज देण्यात आलेल्या मंजुरीमध्ये SiCSem, कॉन्टिनेंटल डिव्हाइस इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (CDIL), 3D ग्लास सोल्युशन्स आणि ॲडव्हान्स्ड सिस्टम इन पॅकेज (ASIP) या प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे. आता सेमीकंडक्टर प्रकल्पांची संख्या १० झाली आहे. या माध्यमातून सहा राज्यात तब्बल १.६० लाख कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे.तसेच हे सर्व प्रकल्प आत्मनिर्भर भारत अभियानासाठी एक महत्वाचं पाऊल ठरणार आहे. या प्रकल्पांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होईल असा अंदाज आहे. तसेच इलेक्ट्रॉनिक उत्पादन क्षेत्राला चालना मिळेल. त्यामुळे अतिरिक्त अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी देखील निर्माण होतील. दरम्यान, आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत आणखी काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत.

# शहरात आता लवकरच ट्रॅफिक ट्रेनिंग अकॅडमी

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पुणे : पुणे शहर पोलिस आयुक्तालयात लवकरच वाहतुकीच्या संदर्भात प्रशिक्षण देणारी, प्रत्यक्ष साधनसामग्रीसह अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज अशी वाहतूक प्रशिक्षण अकादमी (ट्रॅफिक ट्रेनिंग अकॅडमी) सुरू होणार आहे. पुण्यासह पिंपरी-चिंचवड आणि पुणे ग्रामीण येथे कार्यरत असलेल्या पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना येथून प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्याचबरोबर व्यक्ती, शालेय विद्यार्थी, स्कूल बसचालकांना देखील येथे प्रशिक्षण घेण्याची संधी मिळणार आहे. अशी माहिती पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली. शहरात वाहतुकीचा प्रश्न दिवसेंदिवस जटिल होत चालला आहे. पुढील कालावधीत या समस्येवर उपाययोजना करून, शहरातील वाहतूक कशाप्रकारे सुरळीत करता येईल. याबाबत तत्काळ आणि कालांतराने कोणकोणत्या उपाययोजना करता येतील याचा अभ्यास गेल्या काही दिवसांपासून वाहतूक विभागाकडून केला जातो आहे. त्यासाठी काही खासगी संस्थांची देखील मदत घेतली जात आहे.त्याच पार्श्वभूमीवर पोलिसांनी आय.टी.एम.एस. (इंटिग्रेटेड ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टीम) हा उपक्रम शहरात सुरू केला आहे. त्या उपक्रमांतर्गत वाहतूक प्रशिक्षण अकादमी सुरू करण्यात येणार आहे. राज्यातील ही दुसरी वाहतूक प्रशिक्षण अकादमी असणार आहे.

शुक्रवारी (दि. ८) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार पुणे दौऱ्यावर होते. यावेळी यशदा येथे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी शहरातील वाहतूकीच्या संदर्भात पुणे पोलिस करत असलेल्या कामांचे सादरीकरण केले. त्यामध्ये त्यांनी मुंबई येथील भायखळा येथे वाहतूक पोलिसांना प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेसारखीच एक प्रशिक्षण संस्था पुण्यात हवी, असे मत मांडले. त्याला तत्काळ मुख्यमंत्री फडणवीस यांनी मान्यता दिली आहे. त्यामुळे पुढील कालावधीत लवकरच ही प्रशिक्षण अकादमी सुरू होणार आहे. त्यासाठी येरवडा परिसरात जागादेखील निश्चित करण्यात आल्याचे अमितेश कुमार यांनी सांगितले. वाहतूक नियमांचे सतत उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांची शाळा वाहतूक प्रशिक्षण अकादमीत भरणार आहे. नियम मोडल्यानंतर त्यांना येथे ठराविक कालावधीचा अभ्यासक्रम पूर्ण करावा लागणार आहे. त्यामुळे एकप्रकारे पोलिस त्यांची शाळाच येथे घेणार आहेत शिवाय वाहतुकीच्या नियमांबाबत त्यांच्यामध्ये जागरूकता निर्माण केली जाणार आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

बुधवार दिनांक 13/08/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# पिंपरी चिंचवड महापालिकेची अतिक्रमण निर्मूलन मोहिम

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : पिंपरी चिंचवड महापालिकेच्या ड आणि ब क्षेत्रीय कार्यालयांच्या वतीने मुंबई-बंगळुरू राष्ट्रीय महामार्गालगत असणाऱ्या सेवा रस्त्यांच्या रुंदीकरणासाठी अतिक्रमण निर्मूलन मोहिम राबवण्यात आली. ड क्षेत्रीय कार्यालयाच्या वतीने पवना नदी पुलापासून मुळा नदी पुलापर्यंत अंदाजे ७ किलोमीटर लांबीच्या मुख्य महामार्गालगतच्या दोन्ही बाजूंच्या २४ मीटरपर्यंतच्या सेवा रस्त्यांवरील अतिक्रमणे हटवण्यात आली. यासाठी ११० बांधकामांना नोटीस देऊन कारवाई करण्यात आली.



पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, शहर अभियंता मकरंद निकम यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका मुख्यालय अतिक्रमण विभागाचे सहाय्यक आयुक्त अतुल पाटील यांच्या अधिपत्याखाली ड क्षेत्रीय अधिकारी अमित पंडित, ब क्षेत्रीय अधिकारी अश्विनी गायकवाड यांच्या नेतृत्वात ही कारवाई करण्यात आली.

ड क्षेत्रीय कार्यालयांतर्गत क्षेत्रीय अधिकारी अमित पंडित यांच्या नेतृत्वात करण्यात आलेल्या कारवाई वेळी कार्यकारी अभियंता (शहरी दळणवळण), अनधिकृत बांधकाम विभागाचे उपअभियंता, बीट निरीक्षक, विद्युत विभागाचे उपअभियंता, नगररचना विभागाचे सर्वेयर, महाराष्ट्र सुरक्षा दलाचे ७० जवान, तसेच वाकड व रावेत पोलिस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी यांच्या मदतीने ही कारवाई करण्यात आली. कारवाईसाठी ८ जेसीबी, २ क्रेन, ३० मजूर, ब्रेकर यांसारखी यंत्रसामग्री वापरण्यात आली.

तर ब क्षेत्रीय कार्यालयांतर्गत क्षेत्रीय अधिकारी अश्विनी गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या कारवाई दरम्यान बांधकाम परवानगी विभागाचे उपअभियंता, कनिष्ठ अभियंता, ५ बीट निरीक्षक, महाराष्ट्र सुरक्षा दलाचे ५५ जवान, २० पोलीस कर्मचारी व अधिकारी, महापालिकेचे ५ मजूर, १२ खासगी मजूर यांच्या मदतीने ही कारवाई करण्यात आली. यासाठी ६ जेसीबी मशीनचा वापर करण्यात आला.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या या मोहिमेमुळे मुंबई - बंगळुरू महामार्गालगतचे सेवा रस्ते अतिक्रमणमुक्त होऊन वाहतुकीसाठी सुरक्षित आणि सुकर झाले आहेत.

यामुळे नागरिकांची गैरसोय दूर झाली आहे. तसेच या सेवा रस्त्यांवर कुठल्याही प्रकारचे अतिक्रमण केल्यास महापालिकेच्या वतीने कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

# महानगरपालिका जनसंवाद सभेत नागरिकांच्या 62 तक्रार वजा सूचना प्राप्त

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

महापालिकेच्या वतीने पार पडलेल्या जनसंवाद सभेत एकूण ६२ तक्रार वजा सूचना प्राप्त झाल्या आहे.आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या आदेशानुसार पिंपरी चिंचवड शहरातील नागरिक आणि महापालिका प्रशासन यांच्यात सुसंवाद राखण्यासाठी महापालिकेच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांत महिन्याच्या दुसऱ्या



आणि चौथ्या सोमवारी जनसंवाद सभेचे आयोजन करण्यात येते. त्यानुषंगाने आज ऑगस्ट महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी अ, ब, क, ड, इ, फ, ग आणि ह

या आठ क्षेत्रीय कार्यालयात आज जनसंवाद सभा पार पडली.

यावेळी नेमून दिलेल्या समन्वय अधिकाऱ्यांनी जनसंवाद सभेचे अध्यक्षपद भूषविले. पार पडलेल्या जनसंवाद सभेत अ, ब, क, ड, इ, फ, ग आणि ह या क्षेत्रीय कार्यालयात अनुक्रमे ६, ७, ८, ७, ३, १०, १ आणि २० अशा एकूण ६२ तक्रारी वजा सूचना नागरिकांनी उपस्थित राहून मांडल्या.यावेळी नागरिकांनी शहरातील प्रत्येक भागात सुरु असलेल्या स्थापत्य विषयक कामांमुळे नागरिकांना फुटपाथवरून होणारा त्रास, मेट्रो कामामुळे वाहतुकीला होणारा अडथळा, शहरात ठिकठिकाणी पडणारा कचरा,खड्डे, जेष्ठ नागरिक मंचच्या बसण्याची तुटलेल्या खुर्च्या, उद्यानांमधील मोडकळीस आलेली खेळणी, मार्केटच्या ठिकाणी वाहनाची वाढलेली गर्दी, महिला स्वच्छता गृहांची कमतरता आदी तक्रार वजा सूचना जनसंवाद सभेत नागरिकांनी उपस्थित राहून मांडल्या

# पोलीस असल्याची बतावणी करत महिलेकडील दागिने लंपास

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : दुचाकीस्वार दाम्पत्याकडे पोलीस असल्याची बतावणी करुन चोरट्यांनी एक लाख ४० हजारांचे सोन्याचे दागिने लांबविल्याची घटना वारजे भागात घडली. या प्रकरणी वारजे माळवाडी पोलिसांकडून चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत एका महिलेने वारजे माळवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार महिला कोथरूड भागातील उजवी भुसारी कॉलनी परिसरात राहायला आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिला आणि त्यांचे पती रविवारी सकाळी दुचाकीवरुन धायरीला निघाले होते. वारजे चौकातील सेवा रस्त्यावर दुचाकीवरुन आलेल्या दोन चोरट्यांनी दाम्पत्याला अडवले.

पोलीस असल्याची बतावणी चोरट्यांनी केली.

'या भागात महिलांकडील दागिने हिसकावण्याच्या घटना वाढल्या




आहेत. तुम्ही दागिने काढून पिशवीत ठेवा', अशी बतावणी चोरट्यांनी महिलेकडे केली. त्यानंतर महिलेने दागिने काढून पिशवीत ठेवले.

चोरट्यांनी दागिने पिशवीत नीट ठेवले का? अशी विचारणा करुन महिलेला बोलण्यात गुंतविले.महिलेचे लक्ष नसल्याची संधी साधून चोरट्यांनी पिशवीतून एक लाख ४० ह

जारांचे सोन्याचे दागिने लांबविले. धायरीतील काम आटोपून दाम्पत्य घरी आले.

महिलेने पिशवीची तपासणी केली. तेव्हा पिशवीतून दागिने लांबविण्यात आल्याचे उघडकीस आले.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

बुधवार दिनांक 13/08/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# रमेश मोरे दिग्दर्शित 'आदिशेष' चित्रपटाचे शूटिंग पूर्ण

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**राष्ट्रीय पुरस्कार विजेते दिग्दर्शक रमेश मोरे नेहमीच आपल्या मातीतील, सर्वसामान्यांच्या जिव्हाळ्याचे, मनाला भिडणारे आणि मनोरंजनातून प्रबोधन करणारे विषय आपल्या चित्रपटांद्वारे प्रेक्षकांसमोर सादर करीत असतात. मागील बऱ्याच दिवसांपासून ते आपल्या आगामी मराठी चित्रपटाच्या कामात बिझी आहेत. सध्या ते 'आदिशेष' या आगामी मराठी चित्रपटावर काम करीत आहेत. 'आदिशेष' हे चित्रपटाचे शीर्षक उत्कंठावर्धक असून, त्यात मांडलेला विषय आजवर कधीही समोर आलेला नाही. या चित्रपटाचे शूटिंग नुकतेच पूर्ण झाले आहे.**



अष्टमी एन्टरटेन्मेंटच्या बॅनरखाली निर्माते प्राध्यापक दत्तात्रय सांगोरे यांनी 'आदिशेष'ची निर्मिती केली आहे. पहिलीच निर्मिती असलेल्या प्राध्यापक दत्तात्रय सांगोरे यांनी 'आदिशेष'द्वारे निर्मितीक्षेत्रात पदार्पण केले आहे. दिग्दर्शनासोबतच कथा, पटकथा, संवाद व गीतलेखन रमेश मोरे यांनीच केले आहे. दिग्दर्शक रमेश मोरे यांनी आजवर लेखक-दिग्दर्शकाच्या रूपात १९ चित्रपट बनवले असून, तीन चित्रपटांची निर्मितीही केली आहे. २००४ मध्ये 'अकल्पित' या चित्रपटापासून लेखक-दिग्दर्शक म्हणून सुरू झालेला मोरे यांचा प्रवास आज 'साथ सोबत' या चित्रपटापर्यंत येऊन पोहोचला आहे. मोरे यांच्या चित्रपटांनी देश-विदेशांमधील विविध चित्रपट महोत्सवांमध्ये आपला ठसा उमटवत बरेच पुरस्कारही आपल्या नावे केले आहेत. त्यांच्या 'चॅम्पियन्स' या चित्रपटाला सर्वोत्कृष्ट सामाजिक चित्रपट आणि सर्वोत्कृष्ट बालकलाकार हे दोन राष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत. 'आदिशेष'मध्ये त्यांनी पुन्हा एकदा एक वेगळा विषय मांडण्याचे आव्हान स्वीकारले असून, दिग्गज कलाकारांच्या साथीने हा चित्रपट पूर्णही केला आहे. आज विकासाच्या नावाखाली काँक्रीटीकरणाला जणू उत आला आहे. शहरांमागोमाग आता गावेही काँक्रीटीकरणाच्या विळख्यात अडकत चालली आहेत. त्यामुळे जणू निसर्गाचा जिवंतपणाच हरवत चालला आहे. माणूस, नाती, राहणीमान सारं काही व्यावहारीक बनले आहे. परंपराही फॅशनसारख्या पाळल्या जाऊ लागल्या आहेत. 'आदिशेष' हा चित्रपट याच सर्व गोष्टींवर तिरकस भाष्य करतो आणि समाजाला आरसा दाखवण्याचे काम करतो. आजच्या काळातील एक अतिशय महत्त्वपूर्ण विषय कोकणच्या निसर्गरम्य भूमीच्या पार्श्वभूमीवर अत्यंत मनोरंजकरीत्या सादर करण्याचे शिवधनुष्य रमेश मोरे यांनी पुन्हा एकदा यशस्वीपणे पेलले आहे. या चित्रपटाचा विषय आजच्या समाजाला नवी दिशा देणारा ठरेल असे म्हटले तर त्यात काही वावगे ठरणार नाही. कोकणातील संगमेश्वरमधील कडवाई, तुरळ, हारेकर वाडी या ठिकाणी 'आदिशेष'चे चित्रीकरण करण्यात आले.या चित्रपटात अरुण नलावडे, प्रणव रावराणे, आराधना देशपांडे, वैशाली भोसले, सुचित जाधव, सुरेश वाडिले आदी कलाकार आहेत. सिनेमॅटोग्राफी राजा फडतरे यांनी केली असून, संगीत आणि पार्श्वसंगीत अमेय नरे आणि साजन पटेल यांनी दिले आहे. संकलन अभिषेक म्हसकर यांचे असून वेशभूषा यशश्री मोरे, तर रंगभूषा सतिश भावसार यांनी केली आहे. ध्वनी अरुण चेन्नवार यांची असून, केशभूषा रसिका गुरव यांची आहे. धीरज सांगोरे या चित्रपटाचे निर्मिती प्रबंधक असून, यशश्री मोरे कार्यकारी निर्मात्या आहेत.

# भटक्या कुत्र्यांच्या बंदोबस्तासाठी आता "दिल्ली पॅटर्न"

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी-चिंचवड: राज्यात दिवसेंदिवस वाढत चाललेल्या भटक्या कुत्र्यांच्या समस्येकडे आता गंभीर दृष्टीकोनातून पाहण्याची वेळ आली आहे. पिंपरी-चिंचवडसह राज्यातील प्रमुख शहरांमध्ये भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने राजधानी नवी दिल्ली रिजनसाठी दिलेल्या निर्णयाच्या धर्तीवर भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.

याबाबत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवले आहे. तसेच, महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनाही सूचना केली आहे. त्यांनी दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने दि.11 ऑगस्ट 2025 रोजी एक महत्त्वपूर्ण आदेश पारित केला असून, त्यानुसार नवी दिल्ली व एनसीआर (नॅशनल कॅपिटल रिजन) क्षेत्रामध्ये वाढत्या भटक्या कुत्र्यांच्या समस्येमुळे निर्माण होणाऱ्या रॅबीज आणि कुत्र्यांच्या चावण्याच्या घटना अत्यंत गंभीर असल्याचे नमूद करून तात्काळ उपाययोजना करण्याचे आदेश दिले आहेत.सर्वोच्च न्यायालयाचे प्रमुख निर्देश पुढीलप्रमाणे आहेत: 1. सर्व भटक्या कुत्र्यांचे तत्काळ रस्त्यावरून हटविण्यात यावे. 2. संबंधित प्राधिकरणांनी ८ आठवड्यांच्या आत आवश्यक 'डॉग शेल्टर्स' (निवारे) उभारावेत.3. पकडलेल्या कुत्र्यांची नोंद व्यवस्थित ठेवावी आणि एकही कुत्रा पुन्हा रस्त्यावर सोडू नये. 4. कुत्र्यांच्या चाव्याच्या घटनांवर त्वरित प्रतिसाद देण्यासाठी हेल्पलाइन एक आठवड्यात सुरू करावी.

5. रॅबीज प्रतिबंधक लस उपलब्ध असलेल्या ठिकाणांची यादी प्रसिद्ध करावी. 6. भटक्या कुत्र्यांच्या बंदोबस्ताच्या कामात अडथळा आणणाऱ्यांवर (प्राणीप्रेमींचाही समावेश) न्यायालयीन अवमानाची कारवाई करण्यात येईल.

महाराष्ट्रातील प्रमुख महानगरे – मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, सोलापूर,



कोल्हापूर इत्यादी मोठ्या शहरांमध्ये भटक्या कुत्र्यांची संख्या झपाट्याने वाढत असून, अनेकदा लहान मुले, वृद्ध नागरिक व सामान्य नागरिक या कुत्र्यांच्या चावण्यामुळे जखमी होत आहेत, तसेच काही ठिकाणी रॅबीजसारख्या आजारामुळे दुर्दैवी मृत्यू घडले आहेत. याबाबत आम्ही विधानसभा अधिवेशनामध्ये सातत्याने राज्य सरकारचे लक्ष वेधले आहे.दरम्यान, महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह यांनाही पत्र दिले असून, सर्वोच्च न्यायालयाने ज्या प्रमाणे नवी दिल्लीमध्ये निर्णय घेतला. त्याच धर्तीवर पिंपरी-चिंचवडमध्ये उपायोजना करण्याबाबत कार्यवाही करावी आणि सर्वसामान्य नागरिकांना दिलासा द्यावा, असे आमदार लांडगे यांनी म्हटले आहे.

**या उपाययोजना तातडीने राबवण्याची मागणी -**

1. सर्व जिल्हा आणि महानगरपालिका क्षेत्रांमध्ये भटक्या कुत्र्यांची संख्या मोजण्यासाठी एक विशेष मोहीम राबवावी.

2.प्रत्येक शहरात आणि तालुकास्तरावर कुत्र्यांसाठी सुरक्षित निवारे (डॉग शेल्टर्स) उभारण्याचे आदेश द्यावेत.

3 स्थानिक स्वराज्य संस्थांना आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा.

4.सार्वजनिक ठिकाणी रॅबीज प्रतिबंधक लसीकरण मोहीम राबवावी.

5.कुत्र्यांच्या चाव्याच्या घटनांची तक्रार नोंदवण्यासाठी राज्यस्तरीय टोल-फ्री हेल्पलाइन सुरु करावी.

6. सर्व शाळा, अंगणवाड्या, उद्याने, गार्डन्स येथे विशेष निरीक्षण ठेवण्याचे आदेश द्यावेत.

7. या मोहिमेत सहभागी असलेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना कायदेशीर संरक्षण व प्रशिक्षण दिले जावे.

8.या अभियानात अडथळा आणणाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश दिले जावेत.

9. भटक्या कुत्र्यांची समस्या ही केवळ स्वच्छतेची किंवा अडचणीची बाब नसून, जनतेच्या आरोग्याशी थेट संबंधित गंभीर प्रश्न आहे. दिल्लीत सर्वोच्च न्यायालयाने घेतलेल्या दृष्टीकोनानुसार महाराष्ट्रातही तात्काळ समांतर कारवाई झाली पाहिजे.

# आ.सुनील शेळके यांची यवतमाळ जिल्ह्यात प्रकल्प पाहणी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**यवतमाळ : रोजगार हमी योजना समिती प्रमुख आमदार सुनील शेळके यांच्या नेतृत्वाखाली समितीतील विधिमंडळ सदस्यांनी सोमवारी यवतमाळ जिल्ह्यातील दिग्रस, पुसद, दारव्हा, यवतमाळ यासह आठ तालुक्यांमध्ये रोजगार हमी योजनेअंतर्गत सुरू असलेल्या विविध प्रकल्पांची पाहणी केली.**




या दौऱ्यात सार्वजनिक कामे, वैयक्तिक सिंचन विहिरी, करवंद फळबाग लागवड, घरकुल प्रकल्प, रेशीम लागवड व तुती लागवड, कोष संवर्धन गृह, १००० वृक्ष लागवड उपक्रम, पेव्हर ब्लॉक बसविण्याचा प्रकल्प, जिल्हा परिषद शाळेचा वॉल कंपाऊंड बांधकाम, संत्रा फळबाग लागवड आणि सिंचन विहीर प्रकल्प अशा अनेक उपक्रमांना भेट देण्यात आली.

दौऱ्यात स्थानिक नागरिक, कामगार व लाभार्थ्यांशी थेट संवाद साधून त्यांच्या अडचणी, तक्रारी आणि सूचना जाणून घेण्यात आल्या. काही ठिकाणी पायाभूत सुविधांची गरज, तर काही ठिकाणी अंमलबजावणीत येणारे अडथळे नोंदवून घेण्यात आले. स्थानिक अधिकारी, ग्रामसेवक, जिल्हा परिषद सदस्य, सरपंच, पोलिस पाटील, शिपाई यांच्यासोबत सविस्तर चर्चा करण्यात आली. पहिल्या दिवशी चार गट करून आठ तालुक्यांतील कामांची पाहणी व लाभार्थीची भेट घेण्यात आली. दुसऱ्या दिवशी उर्वरित तालुक्यांना भेट देऊन, तिसऱ्या दिवशी जिल्हाधिकाऱ्यांसोबत बैठक होणार आहे. आमदार सुनील शेळके यांनी सांगितले की, "यवतमाळ जिल्ह्यात रोजगार हमी योजनेच्या सर्वाधिक लाभार्थ्यांची नोंद झाल्याबद्दल समाधान वाटते. बहुतांश कामे समाधानकारक पद्धतीने सुरू आहेत.

विहिरी व फळबागांची कामे चांगल्या गतीने होत आहेत.

मात्र रेशीम उत्पादक शेतकऱ्यांना शेडसाठी मिळणारा दीड लाखांचा निधी अपुरा असून तो तीन लाखांपर्यंत वाढवण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. या संदर्भातील निर्णय जिल्हाधिकाऱ्यांसोबतच्या बैठकीत घेतले जातील."

लाभार्थ्यांनी विविध शासकीय योजनांचा तळागाळापर्यंत लाभ मिळत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. प्रशासनाने उपलब्ध निधीचा योग्य वापर करून प्रलंबित तक्रारींचे तातडीने निराकरण करण्यासाठी प्रयत्न सुरू ठेवण्याचे आश्वासन दिले.

# आ.अमित गोरखे यांच्या पाठपुराव्याला यश!

## अण्णाभाऊ साठे महामंडळाच्या जाचक अटी १२ वर्षांनी शिथिल

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : विधानपरिषद आमदार अमित गोरखे यांच्या अथक प्रयत्नांना मोठे यश मिळाले आहे.**

**राज्य सरकारने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळाच्या कर्ज योजनांमधील जाचक अटी शिथिल करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.**

**यामुळे आता समाजातील गरजू घटकांना कर्ज मिळवणे अधिक सोपे होणार असून, महामंडळाकडे प्रलंबित असलेल्या हजारो कर्जांना तातडीने मंजुरी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.**

आमदार अमित गोरखे यांनी या प्रश्नावर अनेक वर्षांपासून पाठपुरावा केला होता. त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सातत्याने या जाचक अटी शिथिल करण्याची मागणी केली होती. तसेच, विधानसभेच्या अधिवेशनातही त्यांनी हा गंभीर मुद्दा उपस्थित करून सरकारचे लक्ष वेधले होते.

मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत आमदार गोरखे यांच्या मागण्यांना हिरवा कंदील मिळाला. या निर्णयानुसार, महामंडळाच्या कर्ज योजनेसाठीची 'एकापेक्षा जास्त जामीनदारांची अट' रद्द करण्यात आली आहे. आता फक्त एकाच जामीनदाराची आवश्यकता असणार आहे, ज्यामुळे कर्ज



प्रक्रिया खूप सोपी होणार आहे. याशिवाय, महामंडळाच्या शासन हमीला पाच वर्षांची मुदतवाढही देण्यात आली आहे. या क्रांतीकारी निर्णयामुळे महामंडळाच्या सर्व प्रलंबित प्रकरणांना त्वरित मंजुरी मिळण्याचा मार्ग सुकर झाला आहे.

या निर्णयानंतर आमदार अमित गोरखे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांचे आभार मानले. या निर्णयाबद्दल बोलताना आमदार गोरखे म्हणाले, "अण्णाभाऊ साठे महामंडळाच्या योजना समाजातील तरुणांना, महिलांना आणि उद्योजकांना आर्थिक बळ देतात. मात्र, सध्याच्या कठोर अटींमुळे अनेक गरजू लाभार्थी या लाभापासून वंचित राहत होते. या अटी शिथिल झाल्यामुळे, आता जास्तीत जास्त लोक या योजनांचा लाभ घेऊ शकतील आणि रोजगारनिर्मितीला गती मिळेल."

हा निर्णय समाजातील वंचित घटकांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी महत्त्वाचा ठरेल, असा विश्वास आमदार गोरखे यांनी यावेळी व्यक्त केला.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968